**<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र १९४/१५ मधील निशाणी ५४ वरील आदेश</u>**
(दिनांक २३.०२.२०१६)

०१. सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांचे विरुध्द विना म्हणणे कैफियतीचा आदेश रद्द बातल होवून मिळणेसाठी आणि त्यांनी दिलेली कैफियत स्विकारण्यासाठी दाखल केले आहे.

०२. प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांच्या म्हणण्या प्रमाणे, वादीने प्रतिवादी विरुध्द वाटपाचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३७ ने दावा मिळकत सर्व्हे क्र. २५८/१/१अ/१ ही मिळकत नामदेव रामचंद्र गायकवाड यांचेकडून खरेदी घेतली असून तो दस्त प्रतिवादी क्र. ३७ कडून गहाळ झाल्यामुळे त्यांना कैफियत देणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांचे विरुध्द विना म्हणणे कैफियतीचा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र ३७ व ३८ हे पती पत्नी असल्यामुळे दाव्यास कैफियत देणेस झालेला विलंब माफ करण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०३. या अर्जास उजर घेत वादीने आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ५४ खाली मांडले. वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादींचा अर्ज हा कायदेशीर व खरा नाही. प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास का उशिर झाला आहे हे योग्य कारण अर्जात नमूद केलेले नाही. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या तरतुदी नुसार प्रतिवादींनी ९० दिवसात कैफियत देणे आवश्यक असतांनाही प्रतिवादींनी ६५ दिवसांचा विलंब केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| **<u>मुद्दे</u>** | | ***<u>निष्कर्ष</u>*** |
| --- | --- | --- |
| ०१ | प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांनी मागणी केल्या प्रमाणे विना म्हणणे कैफियतीचा आदेश रद्द बातल होवून मिळणेस व कैफियत दाखल करुन घेणे आवश्यक आहे का ? | *..होय.* |
| ०२ | कोणता आदेश? | *..अंतिम आदेशाप्रमाणे.* |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दे क्रमांक १ व २:—</u>**

०५. उभयंताच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दाखल सर्व कागदपत्रे तसेच उभंयताना मान्य असलेल्या बाबी पाहता ही बाब आढळून येते की, प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांना समन्स प्राप्त झाल्या पासुन ९० दिवसाच्या आत कैफियत दाखल करणे आवश्यक असतांना प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांनी प्रस्तूतचा अर्ज दिनांक १०.०२.२०१६ रोजी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ३७ व ३८ यांना कैफियत दाखल करण्यास ६५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा निशाणी क्र. ५२ खालील आदेशा प्रमाणे माफ केलेला आहे.

०६. दावा गुणावगुणावर चालण्यासाठी आणि प्रतिवादींचे महत्वपुर्ण हक्क सदरच्या दाव्यात समाविष्ट असल्यामुळे प्रतिवादींचे कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक व्यक्तिला त्याचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली पाहिजे असे नैसर्गिक न्यायदानाचे तत्व आहे. सदरचे तत्व हे प्रतिवादींच्या पक्षात आहे. परंतू, प्रतिवादींनी कैफियत वेळेत न दिल्याने सदरच्या दाव्याचे काम लांबणीवर पडले आहे. म्हणून प्रतिवादींना आदेशित करण्यात येते की, वादीस कॉस्ट/खर्च म्हणून रक्कम रु ७५/— दयावे. या सर्व बाबीचा विचार करुन मुद्या क्रमांक ०१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते. मुद्या क्र २ च्या उत्तरा दाखल वरील चर्चेस अनुषंगून खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

०१. अर्ज मंजूर करण्यात येते.

०२. प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांनी वादीस कॉस्ट रु. ७५/— दिल्यानंतर प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ विरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द बातल होवून प्रतिवादी क्रमांक ३७ व ३८ यांची कैफियत स्विकारण्यात यावी.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

**(श्रीमती आर. आर. संकपाळ)**
दिनांक : २३/०२/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर,
सांगोला

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R.R. Sankpal<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 23.02.2016 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 23.02.2016 |